**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

जावक क्र.ठामपा/निवि/आयुक्त/६७५ दि.२-२-२०१२

## अधिसूचना

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक-२०१२ साठी मा.राज्य निवडणूक आयोगाने त्यांचे आदेश क्र.रानिआ/मनपा २०११/प्र.क्र.१८/का-०५ दि.३-१-२०१२ प्रमाणे निवडणूक कार्यक्रम निश्चित करुन दिलेला होता.

ज्याअर्थी, सदर निवडणूक कार्यक्रम जावक क्र.ठामपा/निवि/आयुक्त/६३५ दि.२४-१-२०१२ प्रमाणे अधिसूचित करण्यात आलेला होता.

ज्याअर्थी, मा.राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्र.रानिआ/मनपा २०११/प्र.क्र.१८/का-०५ दि.१-२-२०१२ नुसार यापूर्वी अधिसूचित केलेल्या कार्यक्रमात अंशतः बदल केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, निवडणूक कार्यक्रमात केलेला अंशतः बदल अधिसूचित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे अनुसूचीतील प्रकरण क्र.१ नियम ८ आणि नियम ११ मधील तरतूदींप्रमाणे मी, आर. ए. राजीव, महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक-२०१२ साठी मा.राज्य निवडणूक आयोगाने अंशतः बदल केलेला खालील निवडणूक कार्यक्रम अधिसूचित करीत आहे.

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु/पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| (१) | सर्वसाधारण प्रवर्गासाठी असलेल्या जागांकरिता (या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित असलेल्या जागांसह) दाखल झालेल्या नामनिर्देशनपत्रांची छाननी व छाननीनंतर वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द् करणे. (छाननी दि.१ फेब्रुवारी, २०१२ रोजी करण्यात आलेली नसल्यास) | दि.२ फेब्रुवारी, २०१२ गुरुवार (सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| (२) | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग या जागांकरिता (या सर्व प्रवर्गातील महिलांसाठी राखीव असलेल्या जागांसह) दाखल झालेल्या नामनिर्देशनपत्रांची छाननी व छाननीनंतर वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द् करणे | दि.३ फेब्रुवारी, २०१२ शुक्रवार (दुपारी १.०० वाजल्यापासून) |
| (३) | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | दि.४ फेब्रुवारी, २०१२ शनिवार (सकाळी ११ ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत) |
| (४) | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | दि.६ फेब्रुवारी, २०१२ सोमवार (सकाळी ११.०० पासून) |

वरील बदलांव्यतिरिक्त मूळ अधिसूचनेतील कोणत्याही कार्यक्रमात अगर उल्लेखात बदल करण्यात आलेला नाही.

( आर. ए. राजीव )
महापालिका आयुक्त
ठाणे महानगरपालिका, ठाणे